महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.संवैशिवस/नीट युजी २०१८/प्रथम निवड यादी/सुचना/१-अ, दिनांक:०४/०७/२०१८.

प्रति,
अधिष्ठाता,
१. सर्व शासकीय/महानगरपलिका/ खाजगी विनाअनुदानीत/ अनुदानीत / अल्पसंख्यांक आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचे महाविद्यालये
२. महात्मा गांधी इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस, सेवाग्राम, वर्धा

**विषय : नीट युजी २०१८ - राज्य स्तरीय कोटा प्रवेश प्रथम निवड यादी संबंधी महत्वाच्या सुचना.**

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता नीट युजी २०१८ या पात्रता प्रवेश परीक्षेद्वारे जाहिर केलेल्या गुणवत्ता यादी नुसार आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाची राज्यस्तरीय कोटयाची प्रथम निवड यादी दिनांक ०४/०७/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर प्रवेश यादी नुसार विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. विद्यार्थी प्रवेशापूर्वी महासीईटी व संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नीट युजी २०१८ च्या नियमावली पुस्तीकेचे अवलोकन करावे.
२. विद्यार्थी प्रवेशाकरीता संस्थास्तरावर जेष्ठ अध्यापकांची नियुक्ती करुन सदर प्रवेशासाठी समिती गठीत करण्यात यावी.
३. सोबत आपल्या महाविद्यालयातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी जोडली आहे. सदर यादीतील विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयात **दिनांक ०५/०७/२०१८ ते १२/०७/२०१८ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत)** मुदत देण्यात आलेली आहे.
४. संचालनालयामार्फत पाठविण्यात आलेल्या निवड यादी मध्ये दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्याच्या प्रवर्गानुसार योग्यती कागदपत्रे उपलब्ध असणे बंधनकारक आहे. संचालनालयातील यादीमध्ये दर्शविलेल्या प्रवर्गा व्यतिरिक्त विद्यार्थ्याकडे कागदपत्रे उपलब्ध असल्यास अशा विद्यार्थ्याबाबात तातडीने संचालनालयाकडून मार्गदर्शन घ्यावे.
५. सदर यादीमधील उमेदवारांना प्रवेश देताना त्यांच्या मुळ कागदपत्रांची छाननी/पडताळणी करणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी संवैधानिक आरक्षणाच्या प्रवर्गातून प्रवेशित झालेले आहेत. अशा उमेदवारांकडे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र आणि आवश्यक असल्यास नॉन क्रिमीलीअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्याकडे जात वैधता प्रमाणपत्र / नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र उपलब्ध नाही, अशा विद्यार्थ्यांकडे जात प्रमाणपत्र समितीकडे / सक्षम प्राधिकाऱ्यांकडे अर्ज सादर केल्याचे कागदोपत्री पुरावा असणे बंधनकारक आहे. अशा उमेदवारांसाठी दिनांक ०३ ऑगस्ट २०१८ पर्यंत जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र / नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम मुदत

असून सदरील मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील याबाबत संबंधीत उमेदवारास कल्पना द्यावी.

६. वरील प्रमाणे प्रवेशाकरीता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे पुर्ण असल्या शिवाय विद्यार्थ्यास प्रवेशाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये.

**७. संवैधानिक आरक्षणाच्या प्रवर्गातून प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्राकरीता प्रस्ताव सादर केलेल्या पावतीची सत्यता पडताळणी करण्याकरीता संबंधीत जात वैधता पडताळणी समितीकडे पाठपुरावा करावा.**

८. आपल्या महाविद्यालयात/संस्थेस प्रवेशासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व अन्य शुल्क दिनांक ०५/०७/२०१८ ते दिनांक १२/०७/२०१८ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) स्वीकारण्यात यावे. शैक्षणिक शुल्क हे डिमांड ड्राफटच्या स्वरुपात स्विकारण्यात यावे.

आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाशी संबंधीत महाविद्यालातील रोखपालांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे शैक्षणिक शुल्क आणि इतर शुल्कापोटी वेगवेगळे दोन डी.डी. तो विद्यार्थी त्यांच्या महाविद्यालयातील प्रवेश निश्चित करेपर्यंत किंवा त्याने घेतलेला प्रवेश रद्द करेपर्यंत किंवा डी.डी. च्या वैध कालावधीपर्यंत आपल्याकडे ठेवून घ्यावेत. डी.डी. प्राप्त झाल्यानंतर फक्त डी.डी.ची पोच देण्यात यावी. प्रवेश निश्चित झाल्याशिवाय शुल्काची पावती देण्यात येवू नये. विद्यार्थ्यांने जर सदर महाविद्यायातील प्रवेश रद्द करुन दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घेतला तर नियमाप्रमाणे प्रवेश रद्द करण्याचे शुल्क (रुपये १५००/- फक्त) विद्यार्थ्यांकडून रोख स्वरुपात घेवून त्याने जमा केलेले दोन्ही डी.डी. त्याला परत करण्यात यावेत.

९. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निदेशाप्रमाणे दिनांक ०१/०८/२०१८ पासून वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांचे शैक्षणिक सत्र सुरु करणे गरजेचे असल्याने तातडीने शैक्षणिक सत्र सुरु करावे व तशी सूचना विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी देण्यात यावी.

१०. आपल्या महाविद्यालयात उपरोक्त मुदतीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जर पुढील निवड फेरीत अन्य महाविद्यालयात प्रवेश बदल नको असल्यास अशा विद्यार्थ्यांसाठी संचालनालयामार्फत देण्यात आलेल्या प्रेफरन्स पुस्तिके मध्ये स्टेटस रिटेंन्शन फॉर्म देण्यात आला आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना पुढील निवड फेरीत प्रवेश नको असल्यास अशा विद्यार्थ्यांनी दिनांक १२/०७/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत त्यांचे स्टेटस रिटेंन्शन अर्ज भरुन ते आपल्या महाविद्यालयात सादर करावयाचे आहेत तशा स्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना द्याव्यात.

११. विद्यार्थी व पालकांमध्ये स्टेटस रिटेंन्शन फॉर्म बाबत बरेच संभ्रम आहेत. त्यामुळे आपणास खालील प्रमाणे सूचना आपण विद्यार्थ्यांना स्टेटस/रिटेंन्श फॉम भरतेवेळी द्याव्यात असे सूचित करण्यात येत आहे.

**" स्टेटस रिटेंन्शन फॉर्म म्हणजे जर विद्यार्थ्यास कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश मिळाला आणि त्या विद्यार्थ्यास जर पुढील निवड फेऱ्यांमध्ये जर प्रवेश बदल नको असेल तरच त्या विद्यार्थ्याने स्टेटस रिटेंन्शन फॉर्म भरणे गरजेचे असते. परंतु त्या विद्यार्थ्यास जर पुढील प्रवेश फेऱ्यांसाठी पात्र व्हायचे असेल तर त्याने स्टेटस रिटेंन्शन फॉर्म भरु नये. विद्यार्थ्यान निवड प्राप्त झालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि स्टेटस रिटेंन्शन फॉर्म भरला नाही तरच तो पुढील फेऱ्यांमधील बदलांकरिता पात्र ठरतो."**

तरी आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थी आपल्या महाविद्यालयात स्टेटस रिटेंन्शन फॉर्म सादर करावयास आल्यावर त्याला उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सूचित करावे व त्यानंतरच त्याच्याकडून स्टेटस रिटेंन्शन फॉर्म भरुन घ्यावा. तसेच जे विद्यार्थी स्टेटस रिटेंन्शन फॉर्म

सादर करणार नाहित त्यांना पुढील प्रत्येक प्रवेश फेरीच्या वेळी त्यांच्या प्रवेशामध्ये बदल झाला आहे अथवा नाही याबाबत खातरजमा करुन घेण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

१२. या प्रक्रियेत रुजू झालेले विद्यार्थी, रुजू न झालेले विद्यार्थी, प्रवेश रद्द केलेले विद्यार्थी आणि स्टेटस् रिटेन्शन अर्ज सादर केलेले विद्यार्थी यांची एकत्रित माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याकरीता संचालनालयामार्फत संगणक प्रणाली तयार करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणालीच्या वापराबाबत खालीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

- प्रथम संचालनालयाच्या 'www.dmer.org' या अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी.
- संचालनालयाच्या 'www.dmer.org' या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठाच्या उजव्या बाजूला 'College Feedback Entry Module' (NEET-UG-2018) अशी लिंक देण्यात आलेली असून सदर लिंकवर क्लिक करावे.
- सदर लिंक क्लिक केल्यानंतर 'Joined/Not Joined/Cancelled/Retention' अशी लिंक दिसेल
- वरीलपैकी सध्या 'Joined/Not Joined/Cancelled/Retention' लिंकवर क्लिक करावे.
- तद्नंतर आपणास 'CET Name', 'Round No.', 'User Name' आणि 'Password' इत्यादी माहिती आपल्या स्क्रिनवर दिसेल. सदरची योग्य माहिती भरुन 'Proceed' वर क्लिक करावे.
- आपल्या संगणक स्क्रिनवर आपल्या संस्थेत प्रथम प्रवेश फेरीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी दिसेल. सदर यादीमध्ये 'Joined/Not Joined/Cancelled/Retention' माहिती भरण्यात यावी व अद्ययावत करण्यात यावी. सदरची माहिती पुर्णपणे भरल्यानंतर सदरची माहिती अचूक भरली आहे का, याची खात्री करुन घ्यावी. सदर माहितीमध्ये आपणास कोणताही बदल करावयाचा झाल्यास 'Edit' म्हणून पर्याय आपणास उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर माहिती व्यावस्थितीतरीत्या भरणा केली आहे याची खात्री केल्यानंतर सदर माहिती 'Download' करण्यात यावी. 'Download' करण्यात आलेल्या माहितीची प्रिंट काढून सदर माहितीच्या प्रत्येक पानावार अधिष्ठाता/ संस्थाप्रमुखांची स्वाक्षरी व महाविद्यालयाचा स्टॅम्प घेण्यात यावा.
- स्वाक्षरी करण्यात आलेली माहिती स्कॅन करुन 'Select File' या बटनाद्वारे 'Select' करावी. तद्नंतर स्कॅन केलेली माहिती 'Upload' बटनाद्वारे पुन्हा 'Load' करावी. सदर माहिती 'Load' झाल्यानंतर 'Final Submission to DMER' या बटनावर क्लिक करुन संचालनालयास दिनांक १२/०७/२०१८ रोजीपर्यंत सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत सादर करावी. तसेच सदरहू माहितीची एक प्रत या संचालनालयाच्या 'neetugreport2018@gmail.com' या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावी. उक्त माहिती उक्त कालावधीमध्ये दैनदिनरित्या भरण्यात यावी.

१३. शासन निर्णय क्र. एमईडी १०१६/प्र.क्र.४७३/१६/ शिक्षण २, दिनांक ०३ मे २०१८ अन्वये जे उमेदवार आर्थिकदृष्टया मागास संवर्गातील म्हणजेच ज्यांच्या पालकांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु. ८ लक्षपेक्षा कमी आहे, अशा खुल्या संवर्गातील उमेदवारांकडून प्रवेशाच्या वेळीच शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी रक्कम शैक्षणिक शुल्क म्हणून आकारण्यात यावी. अशा उमेदवारांना शासनाच्या “राजर्षि छत्रपति शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत” ५० टक्के शैक्षणिक शुल्क प्राप्त होणार आहे. सदरील उमेदवारांकडून प्रवेशाच्या वेळी शैक्षणिक शुल्काच्या संपुर्ण रक्कमेचा भरणा करण्याबाबत आग्रह धरु नये, प्रवेशाच्यावेळी संपूर्ण शैक्षणिक शुल्काच्या रक्कमेचा आग्रह धरल्यास व तशी मागणी केल्यास महाविद्यालयांविरोधात यथायोग्य कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१४.शासन निर्णय क्र. एमईडी १०१६/ प्र.क्र.३४५/१६/शिक्षण २, दिनांक ०५ जानेवारी २०१८ अन्वये राज्यातील शासन अनुदानित / विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस अभ्यासक्रमाचे जे विद्यार्थी शासनाच्या आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विजाभज इमाव विभाग व विमाप्र कल्याण विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या विविध शिष्यवृत्ती / प्रतिपूर्ती योजनेचा लाभ घेतात अशा सर्व विद्यार्थ्यांना एमबीबीएस अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर शासनाची एक वर्ष बंधपत्रित सेवा करणे बंधनकारक आहे, याबाबत सर्व शासकीय / महानगपालिका / खाजगी / विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांनी नोंद घ्यावी व संबंधीत विद्यार्थ्यांना याची कल्पना द्यावी. सदरील बंधपत्राचा नमुना संचालनालयामार्फत एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या कट-ऑफ-डेट नंतर सर्व महाविद्यालयांना उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरीता नीट-युजी २०१८ च्या माहिती पुस्तिकेतील पृष्ठ क्र. २४ वरील नियम क्र. १४.२ अवलोकावा.

१५. महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या रॅगिंग सदृश प्रकारांमध्ये झालेली वाढ लक्षात घेता अशा प्रकारांवर आळा घालण्याकरीता भारतीय आयुर्विज्ञान परिषदेमार्फत दिनांक २१ फेब्रुवारी, २००९ आणि दिनांक ०३ ऑगस्ट, २००९ च्या पत्रानुषंगाने मार्गदर्शकतत्वे निर्धारित केली असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. आपणास कळविण्यात येते की, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे आवश्यकती सर्व कार्यवाही आपल्यास्तरावर अचूकपणे होणे अत्यंत आवश्यक आहे. या व्यतिरिक्त सोबत रॅगिंग प्रतिबंध करावयाच्या दृष्टीने आवश्यकती कार्यवाही करण्याबाबतचे पत्र आणि शासनाच्या परिपत्रकाची प्रत सोबत जोडली असून आपल्या महाविद्यालयात रॅगिंग प्रतिबंधक करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त बाबत प्राध्यान्याने व कटाक्षाने कार्यवाही करण्यात यावी हि विनंती.

**संचालक**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर:**

१. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, ९ मजला गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, मुंबई.
२. मा.आयुक्त राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य मुंबई
३. मा.कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ, म्हसरुळ, वणी रोड, नाशिक
४. संचालक, आयुर्वेद संचालनालय, ४ मजला, शासकीय दंत महाविद्यालय इमारत, मुंबई

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक एमईडी १०१६/प्र.क्र.४७३/१६/शिक्षण-२**
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
**दिनांक :०३ मे,२०१८**

**वाचा** :

१) शासननिर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक- टीईएम२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३.१०.२०१६
२) शासननिर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक- एमईडी१०१६/ प्र.क्र. ४७३/ १६/ शिक्षण-२, दिनांक ०९.१२.२०१६
३) शासननिर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक- टीईएम२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५.०४.२०१७
४) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक- ईबीसी २०१८/ प्र. क्र. ३८ /तांशि-४, दिनांक १४.०२.२०१८
५) शासननिर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक- एमईडी १०१८/ प्र.क्र. ४९/ १८/ शिक्षण-२, दिनांक१७.०४.२०१८

**परिपत्रक:-**

राज्यातील शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न विहीत केलेल्या मर्यादेत आहे अशा विद्यार्थ्यांना काही अटी व शर्तींसह शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रकमेची प्रतिपुर्ती करण्याकरीता "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेस" संदर्भाधीन क्रमांक १ वरील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने, राज्यातील शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक पदवीपुर्व अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेचा" लाभ

मिळावा या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक २ वरील शासननिर्णयान्वये पुरक आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच, शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील एमबीबीएस व बीडीएस अभ्यासक्रमांस प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न रु.२.५० लाख ते रु.६.०० लाख या दरम्यान आहे, अशा विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या रकमेच्या प्रतीपुर्ती ऐवजी शासनाने/सक्षम प्राधिकरणाने संबंधीत अभ्यासक्रमांकरीता विहीत केलेल्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात देण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक ५ वरील शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. संदर्भाधीन क्रमांक ३ वरील शासननिर्णयान्वये "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेचे" नामकरण "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" असे करण्यात आले आहे. तसेच, सदर योजनेंतर्गत शासनाने/ सक्षम प्राधिकरणाने विहीत केलेल्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बॅक खात्यावर जमा करण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त झाल्यावर विद्यार्थ्याने संबंधीत महाविद्यालयास अदा करावयाची आहे. त्यामुळे आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी त्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात प्राप्त होणाऱ्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम त्यांच्या महाविद्यालयास प्रवेशाच्या वेळी अदा करणे आवश्यक नाही. आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी देखील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन त्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात अनुज्ञेय होणारी शिक्षण शुल्काच्या रकमेचा भरणा प्रवेशाच्या वेळीच करण्याबाबत विद्यार्थ्यांकडे आग्रह धरु नये वा त्याकरीता प्रवेश करण्यास टाळाटाळ करु नये. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळीच शिक्षण शुल्काच्या संपुर्ण रकमेचा भरणा करण्याबाबत आग्रह धरल्यास वा तशी मागणी केल्यास अशा महाविद्यालयांविरोधात यथायोग्य कारवाई करण्यात येईल.

३. "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" प्राप्त होणाऱ्या शिक्षण शुल्काच्या शिष्यवृत्ती रकमेचा भरणा प्रवेशाच्या वेळीच करण्याबाबत शिक्षण संस्थांनी आग्रह धरु नये असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीता संदर्भाधीन क्रमांक ४ वरील शासन

परिपत्रकान्वये सुचना निर्गमित केल्या आहेत. सदर शासन परिपत्रकातील सुचना "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरीता देखील लागु राहतील.

४. सदर शासन परिपत्रक संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि संचालक, आयुष संचालनालय यांनी त्यांच्या अखत्यारीतील महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे व सदर परिपत्रकातील सुचनांचे संबंधीत महाविद्यालयांकडुन काटेकोर पालन होईल याबाबत खातरजमा करावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५०३१५१७३४७६१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, serialNumber=f0abc250c4d9be2b6b786fa7056a78c0298ba36e78a4582723738fdd3d550d44, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2018.05.09 15:48:23 +05'30'

**(सुरेन्द्र प्र. चानकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.

सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सह/उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये (बृहन्मुंबई महानगरपालिका)
अधिष्ठाता/ प्राचार्य, सर्व शासकीय/महानगरपालिका / अनुदानित / खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान महाविद्यालये.
निवड नस्ती ( कार्यासन शिक्षण-२).

एम.बी.बी.एस. आणि बी.डी.एस. अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी कुटूंबाच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक.एमईडी १०१८/प्र.क्र.४९/१८/शिक्षण-२

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.

दिनांक: २८ जून,२०१८

**संदर्भ:-** १)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३/१०/२०१६

२)शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग क्र.एमईडी१०१६/प्र.क्र.४७३/१६/ शिक्षण-२, दिनांक ०९/१२/२०१६

३)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ०७/१०/२०१७

४)शासन निर्णय, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग क्र.इबीसी-२०१७/ प्र.क्र.२७/शिक्षण, दिनांक ०१/०१/२०१८

५)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.टीईएम-२०१८/प्र.क्र.३५/तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१८

६)शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग क्र.एमईडी१०१६/प्र.क्र.४७३/१६/ शिक्षण-२, दिनांक ०५/०३/२०१८

७)शासन निर्णय समक्रमांक, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, दिनांक १७/०४/२०१८

**प्रस्तावना:**-राज्यातील शासकीय/शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील रु.२.५० लाख ते रु.६.०० लाख या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न गटातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील एम.बी.बी.एस आणि बी.डी.एस अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना घेतलेल्या शैक्षणिक कर्जावरील व्याज अनुदानाऐवजी इतर अभ्यासक्रमांप्रमाणे ५० टक्के शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" संदर्भाधीन दिनांक १७/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय करण्यात आली आहे. तथापि, संदर्भाधीन दिनांक ३१/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत पात्रतेकरिता कुटूंबाची उत्पन्न मर्यादा रु.६.०० लाख वरुन रु.८.०० लाख अशी वाढविण्यात आली आहे. उक्त योजनेच्या लाभासाठी उत्पन्न मर्यादेतील सदर वाढ ही राज्यातील शासकीय/शासन

अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील एम.बी.बी.एस आणि बी.डी.एस अभ्यासकमाच्या विद्यार्थ्यांनादेखील लागू करण्यात यावी असा निर्णय मराठा क्रांती मोर्चाच्या विविध मागण्यांबाबत निर्णय घेण्याकरिता शासनाद्वारा स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ०३/०५/२०१८ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला असून त्यानुसार आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

१. राज्यातील शासकीय/शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील एम.बी.बी.एस आणि बी.डी.एस अभ्यासक्रमाच्या पात्र विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञानाच्या इतर व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाप्रमाणे "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" त्याच्या शिक्षण शुल्काच्या रक्कमेची ५०% शिष्यवृत्ती अदा करण्याच्या अनुषंगाने दोन्ही पालकांची एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.६.०० लाखावरुन रु.८.०० लाख करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. या योजनेचा लाभ हा शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू राहील.

३. उपरोक्त निर्णयानुसार सन २०१८-१९ पासून आरोग्य विज्ञानाच्या सर्व मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न हे रु.८.०० लाखाच्या मर्यादेत असेल, त्या विद्यार्थ्यांना "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" ५०% शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा लाभ अनुज्ञेय होईल.

४. उत्पन्न मर्यादेतील वरील सुधारणेनुसार "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" ही विहीत अटी व शर्तीनुसार पूर्वीप्रमाणेच राबविण्यात येईल.

५. हा शासन निर्णय हा मंत्रिमंडळ उपसमितीच्या मान्यतेने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २५५/२०१८/व्यय-१३, दिनांक २६/०६/२०१८ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक 201806281622173413 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२८।६।१८

(सुरेन्द्र प्र.चानकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री, महसूल तथा अध्यक्ष, मंत्रीमंडळ उपसमिती यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव,अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग कल्याण विभाग मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, विजाभज इमाव व विमाप्र, पुणे
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व सहसचिव/उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये (बृहन्मुंबई महानगरपालिका)
अधिष्ठाता/प्राचार्य सर्व शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान महाविद्यालये (संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय/आयुष संचालनालय यांचेमार्फत)
निवडनस्ती (शिक्षण-२)

**शासन अनुदानित व खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस अभ्यासक्रम पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शासनाची बंधपत्रित सेवा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

**शासन निर्णय क्र. एमईडी १०१६/प्र.क्र.३४५/१६/शिक्षण-२,**

नववा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, नविन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.

**दिनांक : ०५ जानेवारी, २०१८.**

**संदर्भ**

१. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी-१००७/ प्र.क्र.४९०/०७/ शिक्षण-२, दिनांक ०८.०२.२००८.

२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी-१०१३/ प्र.क्र.१०१/१३/ शिक्षण-२, दिनांक ३१.०१.२०१४.

३.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईडी १०१७/ प्र.क्र.१७१/ १७/ शिक्षण-२, दिनांक १२.१०.२०१७ व दिनांक २४.११.२०१७

<u>प्रस्तावना</u> :

राज्यातील शासकीय आणि महापालिका वैद्यकीय/ दंत महाविद्यालयातून वैद्यकीय/ दंत पदवी/ पदव्युत्तर पदविका/ पदव्युत्तर पदवी/ अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमाकरीता एक वर्ष कालावधीची शासनाची बंधपत्रित सेवा पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे वैद्यकीय सेवा देण्याकरीता शासनास बऱ्याच प्रमाणात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होतात. तथापि, राज्यातील ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागामध्ये वैद्यकीय सेवा पुरविण्यास अजुनही पुरेसे डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. तसेच, आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडून अनुक्रमे अनुसुचित जमाती व अनुसुचित जाती या संवर्गातील खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या १०० टक्के रकमे एवढी शिष्यवृत्ती अदा करण्यात येते. तसेच ,विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या संवर्गातील खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण

शुल्काच्या १०० टक्के व इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रकमेएवढी शिष्यवृत्ती अदा करण्यात येते.

खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना देखील शिक्षण शुल्काच्या ५०टक्के रकमेची वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत प्रतिपुर्ती करण्यात येते. तसेच, शासन अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून देखील शासकीय महाविद्यालयांप्रमाणेच अत्यंत माफक स्वरुपात शुल्क आकारले जाते. शासनाच्या विविध विभागाकडुन वैद्यकीय पदवी (एमबीबीएस) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती/शिष्यवृत्ती याचा खर्च राज्यातील जनतेच्या पैशातुन केला जातो. सदर खर्चाची काही अंशी परतफेड व्हावी व राज्यातील ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागामध्ये वैद्यकीय सेवा पुरविण्यास पुरेसे डॉक्टर्स उपलब्ध व्हावे या अनुषंगाने राज्यातील शासन अनुदानित आणि खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना एमबीबीएस अभ्यासक्रमाकरीता शासनाची शिष्यवृत्ती/प्रतिपुर्ती प्राप्त होते अशा विद्यार्थ्यांना शासनाची एक वर्षाची बंधपत्रित सेवा करणे बंधनकारक करण्याबाबत निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे .

**<u>शासन निर्णय:-</u>**

राज्यातील शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस अभ्यासक्रमाचे जे विद्यार्थी आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या विविध शिष्यवृत्ती/प्रतिपुर्ती योजनेचा लाभ घेतात अशा सर्व विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पुर्ण झाल्यांनतर शासनाची एक वर्षाची बंधपत्रित सेवा करणे बंधनकारक राहील.

२. बंधपत्रित सेवेची वरील अट ही सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून वैद्यकीय पदवी (एमबीबीएस) अभ्यासक्रमास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

३. शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस अभ्यासक्रमाचे जे विद्यार्थी आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण

विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या कोणत्याही शिष्यवृत्ती/प्रतिपुर्ती योजनेचा लाभ न घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर बंधपत्रित सेवा बंधनकारक राहणार नाही.

४. बंधपत्रित सेवा करणे आवश्यक असलेल्या उमेदवारांनी जर त्यांना वाटप करण्यात आल्यानुसार वैद्यकीय सेवा पुरविण्यात कसूर केल्यास संबधित उमेदवारांना शासनाकडून शिष्यवृत्ती/प्रतिपुर्ती स्वरुपात प्राप्त शुल्काची रक्कम ही व्याजासह शासनास परत करणे आवश्यक राहील. या व्यतिरिक्त बंधपत्रित सेवेबाबत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना ज्या अटी /शर्ती लागू आहेत, त्या अटी/शर्ती वरील उमेदवारांनासुध्दा लागू होतील.

५. वरीलप्रमाणे उपलब्ध होणाऱ्या बंधपत्रित उमेदवारांना बंधपत्रित सेवा वाटप करण्याबाबत व अनुषंगीक कार्यवाही संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आणि संचालक, आरोग्य सेवा यांच्यामार्फत करण्यात येईल .

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०५११५६१७४७१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, serialNumber=f0abc250c4d9be2b6b786fa7056a78c0298ba36e78a4582723738fdd3d550d44, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2018.01.05 17:06:17 +05'30'

**(सुरेन्द्र प्र. चानकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुबंई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व सह/ उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विजाभज इमाव व विमाप्र, पुणे.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा संचालनाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
अधिष्ठाता/ प्राचार्य, महात्मा गांधी इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस, सेवाग्राम, वर्धा.
अधिष्ठाता/ प्राचार्य सर्व खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालये.
निवडनस्ती (शिक्षण-२).